स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **28–02–2014** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | **सभापती** |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 12. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 705** :– प्रभाग क्र. 72 अंतर्गत जयप्रकाश नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 17.85 टक्के अधिक दराची रू. 3331394/– (तैतीस लक्ष एकतीस हजार तीनशे चौऱ्यांनव) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 3331394/–पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 706** :– नामांतर शहीद स्मारक 10 नं. पुल कामठी रोड इंदोरा येथील अतिरिक्त कामाकरीता सुधारीत रु. 1,09,43,978/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच कामाचे कंत्राटदार श्री. एस.जे. शर्मा यांना अतिरिक्त राशी रु. 7,84,437/– कार्यादेश देण्याच्या प्रस्तावाला प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 707** :– प्रभाग क्र. 63 अ, आशिर्वाद नगर (मार्केट रोड, बॅंक कॉलोनी) न्यु सुभेदार लेआऊट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्वत प्राप्त निविदा पैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन कपंनी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.70 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 2.31 प्रतिशत ने अधिक दराची रू. 62,51,782/– (बासष्ठ लक्ष एक्कावन हजार सातशे ब्याऐंशी फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 708** :– प्रभाग क्र. 35 अ–ब, पुनापूर रोड, ओमजय मेडीकल ते आयुष किराणा व पारडी रामदयाल सोनी ते भांडेवाडी रोड येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रू. 29,99,892/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास मंजूरी प्रदान करुन उपरोक्त काम म.न.पा. च्या हॉट मिक्स प्लांन्ट मार्फत करण्याच्या सुचनेसह विषय एकमताने मंजूर तसेच रु. 29,99,892/– ही रक्कम त्या विभागास वळती करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 709** :– प्रभाग क्र. 63 ब, आशीर्वाद नगर, राजीव गांधी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. आर.एम. दयारामानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.77 टक्के अधिक दराची रू. 28,86,809/– (अठ्ठावीस लक्ष शहाऐंशी हजार आठशे नऊ फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 710** :– प्रभाग क्र. 72 क अंतर्गत राजीव नगर अरुण ऑटो ते गजानन मंदीर तपोवन पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. एल.सी. मुरुबक्षानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.45 टक्के अधिक दराची रू. 2773886/– (सत्तावीस लक्ष त्र्याहत्तर हजार आठशे छयान्शी) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 2773886/– पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मे. एल.सी. मुरुबक्षानी ऐवजी मे. एल.सी. गुरुबक्षानी या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 711** :– प्रभाग क्र. 56 ब अंतर्गत रिंग रोड ते आजाद हिंद चौक (साई मंदीर ) येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. आर. एम. गोपलानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19.35 टक्के अधिक दराची रू. 5966857/– (एकोनसाठ लक्ष सहासष्ठ हजार आठशे सत्तावन) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 5966857/– पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 712** :– प्रभाग क्र. 51 येथील कॉंग्रेस नगर येथे श्री. जैन श्री. जैन, श्री. शरद कुलकर्णी व श्री. घिया यांचे घराजवळ नाल्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव निविदा पैकी मे. आर. बी. यादव यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.88 टक्के कमी दराची रू. 3643178/– (छत्तीस लक्ष त्रेचाळीस हजार एकशे अठयात्तर) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात

घेऊन तसेच, हे काम पद क्र. 618 (A43901370812) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 3643178/— पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 713 :— लक्ष्मीनगर झोन क्र. 1 येथे झोनल कार्यालयाचे व नागरीसुविधा केन्द्राचे विविध बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. सुविचार कंस्ट्रक्शन यांची मुळ दरापेक्षा 4.05 टक्के प्रतिशत कमी दराची म्हणजेच रू. 5,79,26,934/— रकमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन आर्थिक वर्ष 2013—2014 मध्ये कार्यादेश राशी रु. 50.00 लक्ष सिमित ठेवण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 714 :— प्रभाग क्र. 69 अ अंतर्गत शास्त्री ले—आऊट ते डी.पी. रोड युनीयन बॅंक ते गांवडे ले—आऊट वे टेलीकॉम नगर येथील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे काम कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 3442475/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A422001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 715 :— महाराष्ट्र शासनाने तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत प्रभाग क्र. 27, मधील श्री. खंडोबा देवस्थान, शनिवारी, सुभाष रोड, नागपूर या देवस्थानाचा समावेश "क" श्रेणी तिर्थक्षेत्र म्हणून केलेला आहे. खंडोबा देवस्थानच्या जागेत सामुदायीक भवन बांधकामास्तव रु. 91.28 रकमेच्या कामास शासनाचे तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून या कामास्तव निविदा मागविल्या असता. मे. सुविचार कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 17.2 टक्के अधिक दराची नविन सी.एस.आर. नुसार 4.01 टक्के कमी दराची निविदा रु. 1,06,99,093/— (रुपये एक कोटी सहा लक्ष नव्व्यान्नव हजार त्रेन्नव फक्त) रकमेच्या राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करणे तसेच म.न.पा. चा 15 टक्के हिस्सा रु. 13.69 लक्ष रकमेची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 716 :— नागपूर शहरातील प्रमुख रस्ते, मैदाने इत्यादी ठिकाणी बसविण्यात आलेले पथदिवे ऊर्जा कार्यकुशल एल.ई.डी. पथदिव्यांनी ऊर्जा बचतीच्या रकमेतून परतफेड करण्याचा धर्तीवर बदलवून घेणे व या पथदिव्यांकरीता अस्तित्वात असलेल्या यंत्रणेतील निकामी केबल्स, खांब फिडर बॉक्सेस इत्यादी बदलणे या कामास्तव आवश्यक खर्चाची परतफेड ई. एम.आय. रूपाने पाच वर्षाच्या कालावधीमधे करण्याच्या धर्तीवर बदलणे या कामाकरीता प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे मे. जे.के. सोल्यूशन इन., नागपूर यांनी नागपूर महानगरपालिकेस उर्जा बचतीच्या रकमेतून सर्वात जास्त हिस्सा देण्याचे अनुषंगाने दर दिले असल्याने व इतर कामांकरीता सर्वात कमी दर दिले असल्याने या कामामधे जे पथदिवे /फ्लड लाईटस् लावणे या निविदेमधे अनुज्ञेय आहेत त्यांची प्रत्यक्ष तपासणी केली असता आढळलेली अत्यंत चांगली प्रकाश व्यवस्था निविदेमधे नमूद वॅटेज् पेक्षा कमी वॅटेज मधे करणे शक्य आहे व असे करण्यास निविदा प्रपत्रामधे मुभा असण्याचा विचार करता अपेक्षेपेक्षा जास्त उर्जा बचत होणार आहे, या सर्व बाबींचा विचार करता मे. जे के. सोल्यूशन इन, नागपूर यांची सुधारीत दराची निविदा खालील प्रमाणे मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

'अ' वरील इन्फ्रास्ट्रक्चर स्ट्रेन्दनिंगचे कामाकरीता प्राकलनीय रकमेच्या तुलनेत १० टक्केने जास्त असलेला सुधारीत दर मंजूर करून "डेफर्ड पेमेन्ट ऐवजी" जस जसे काम होईल त्यानुसार भुगतान करण्यास या कामाचा अवधी १८ महिने असण्याचा विचार करता या खर्चाचा बोजा दोन आर्थीक वर्षांमधे येणार असण्याचा विचार करता मंजूरी प्रदान करण्यास तसेच निविदाकाराने टु स्टेप डिमिंग फॅसीलीटी च्या फिटिंज्करीता कम्पॅटेबल फिडर पिलर्सचा सुधारीत दर रू. ३.२५ लक्ष प्रती फिडर हा मंजूर करण्यास व या अनुषंगाने या कामाकरीता रू. ४३.४१७ कोटी निविदा राशी मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

'ब' वरील अस्तित्वात असलेले पथदिवे/फ्लड लाईटस् उर्जा कार्यक्षम एल.ई.डी. पथदिवे /फ्लड लाईटस् बदलणे याकरीता नागपूर महानगरपालिकेस एकुण उर्जा बचतीच्या रकमेच्या १० टक्के हिस्सा देण्याची तयारी दर्शविली असण्याच्या अनुषंगाने उर्वरीत ९० टक्के हिस्सा निविदेतील यासंदर्भातील अटी व शर्तीचे अधीन राहून कंत्राटदारास देण्यास व निविदा अटी व शर्तीचे अधीन राहून यामधे वॅटेजेस् कमी करून जास्तीत जास्त उर्जा बचत साध्य करून वर नमूद केल्यानुसार या उर्जा बचतीपोटी बचत होणाऱ्या रकमेची विभागणी करण्यास व दिवे बदलविण्याचे या कामाचा कालावधी १८ महिन्यांचा असण्याचा विचार करता निविदा अटी शर्तीमधे नमूद केल्यानुसार प्रत्येक पॅनलवरून कंट्रोल होणाऱ्या पथदिव्याच्या/फ्लड लाईटस्च्या सिस्टीम मधील काम जसे जसे पूर्ण होईल त्यानंतर एकूण १३ वर्षाच्या काळाकरीता निविदाकारास देय असणारा उर्जा बचतीचा हिस्सा प्रत्यक्ष उर्जा बचतीच्या काळातील पथदिव्यांमुळे होणाऱ्या उर्जेची खपत याकरीता लागू असणाऱ्या दराने देण्यास कृपया मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

'क' वर नमूद या सर्व निविदा अटी शर्ती नुसार पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करणे या कामाकरीता १० टक्के ने जास्त असलेला दर रू. ६६/— प्रती पथदिवा/फ्लड लाईट प्रती माह मंजूर करून यानुसार एकूण २६,७१२ पथदिवे /फ्लड लाईटस् करीता प्रथम वर्षी रू. २.११५ कोटी प्रती वर्ष खर्च मंजूर करण्यास व वेळोवेळी या पथदिव्यांमधे होणाऱ्या वाढीनुसार व निविदाकाराने दिलेल्या दरानुसार प्रती वर्ष १२ टक्के ने वाढ करून त्यानुसार येणाऱ्या खर्चास मंजूरी प्रदान करण्यास व 'ब' वरील उर्जा बचतीचा हिस्सा ते काम पूर्ण करण्याचा १८ महिन्यांचा कालावधी असण्याचा विचार करता १३ अधिक ३ वर्ष (निविदा अटी व शर्ती नुसार अट क्र. १३— स्पेशल टर्मस् अॅड कंडीशन्स् नुसार) म्हणजे 16 वर्षाकरीता हे देखभाल दुरूस्तीचे काम करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच 'ड' वरील कामा संदर्भात निविदाकाराने दिलेला प्राकलनीय दरांच्या तुलनेत १० टक्के ने जास्त असलेला सुधारीत दर मंजूर करून वर नमूद केल्यानुसार १३+३ अश्या प्रकारे एकूण १६ वर्षाच्या कालावधीकरीता या काळामधे प्रत्यक्ष काम होणाच्या वेळेस जे दर महाराष्ट्र शासनाच्या संबधीत विभागीय दर सूचीमधे असतील त्यावर निविदा अटी शर्तीनुसार १० टक्के जास्त दर लागू करून त्यावेळेस प्रत्यक्ष होणाऱ्या कामाचे भुगतान करण्यास व याकरीता येणाऱ्या खर्चाची रक्कम प्रत्यक्ष काम होण्याचे वेळेस अंदाजपत्रकीय तरतूदीचे अनुषंगाने उपलब्ध असण्याचे अनुषंगाने निश्चीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच 'इ' वरील डिसमेंटल होणारे साहित्याकरीता दिलेले दर नामंजूर करून याकरीता वेगळया निविदा बोलाविण्यास व हे साहित्य या निविदेमधे मंजूर एजन्सीने संबंधीत झोनल इंजिनिअरकडे सुपुर्द करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 717 :— महानगरपालिकेच्या विविध कार्यालयाकरीता सोलर फोटो व्होल्टाईक पावर पॅक लावण्याकरीता प्राप्त निविदांपैकी मे. किर्लोस्कर इंटीग्रेटेड टेक्नॉलॉजी लि. यांची प्राकलनीय दराच्या तुलनेत 14.29 टक्के ने कमी असलेली रू. 1,50,00,000/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 718 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर